Estd. 1962
"A++" Accredited
byC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,**
**MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, Special Cell- (0231) 2609148
Website - www.unishivaji.ac.in E-mail- spcell@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४, महाराष्ट्र**
**विशेष कक्ष**
दूरध्वनी — ईपीएबीएक्स — २६०९०००, विशेष कक्ष — (०२३१)२६०९१४८
वेबसाईट— www.unishivaji.ac.in, ई—मेल — spcell@unishivaji.ac.in

जा.क्र.विशेष कक्ष/२०२४—२५/620/ दिनांक : 30 MAY 2024

No 00060

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय** : १. सन २०२४—२५ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण.
२. सन २०२४—२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणांस योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | समाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | SEBC | १० % |
| ९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| १० | खुला | OPEN | ३० % |
| | | एकूण | १०० % |

टीप : १) संस्था/महाविद्यालयातील प्रवेशासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षणाबाबत अंमलबजावणी, प्रवेश प्रक्रीयेच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करावयाची आहे. त्याचप्रमाणे त्या—त्या वेळी लागू होणारे शासन धोरणातील बदल लागू राहतील.

२) सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) याकरिता आरक्षण हे महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अनिधनियम क्र. १६) अन्वये लागू करण्यात आले आहे. यानुसार प्रवेशाकरिता लागू करण्यात आलेले निकष व टक्केवारी वरील प्रमाणे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भात शासन धोरणात/निर्णयात सुधारणा लागू झाल्यास त्याप्रमाणे सदर सुधारणा लागू राहतील.



Scanned with OKEN Scanner